MHKO100000542008

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८**

भैरु कांबळे-मयत वारस वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे-मयत वारस वगैरे.

**निशाणी क्र. ९३ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "पुरावा बंद" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादींतर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे सन २००८ साली दाखल असुन ते प्रतिवादींच्या पुराव्याकरीता ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत असुन देखील प्रतिवादींनी पुरावा दाखल न केल्यामुळे दिनांक ०४/१०/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.२ यांचा पुरावा बंद करण्यात आला. प्रस्तुत अर्जाअन्वये प्रतिवादी यांनी, दिनांक ०४/१०/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.२ हे आजारी असलेने त्यांना न्यायालयात हजर राहता आले नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द पुरावा बंदचा आदेश पारीत झाला आहे असे कारण नमुद केलेले आहे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात झालेला विलंब पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता पक्षकारांमध्ये पुन्हा नवीन प्रकरण दाखल होऊन गुंतागुंत वाढण्याची शक्यता असल्याने प्रतिवादीस संधी देणे संयुक्तीक वाटते. प्रतिवादी यांचेमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य वाटत आहे. त्यामुळे, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

**०१.** अर्ज रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**०२.** खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.२ यांनी पुढील तारखेपर्यंत वादी यांना अदा करावी. तसे न झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात यावा.

**सही/-**
**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०१/१२/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 11/10/2023 |
| Order signed by P.O. on | 11/10/2023 |
| Order uploaded on | 11/10/2023 |